<u>राज्याचे युवा धोरण -२०१२</u> युवा प्रशिक्षण केद्रांची स्थापना.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः युकयो-२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १२ नाव्हेंबर, २०१३.

**वाचा -**

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः युकधो-२०११/प्र.क्र.४३/क्रीयुसे-३, दिनांक १४ जून,२०१२.

**प्रस्तावना -**

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध विषयात युवांनी पार पाडलेल्या भूमिका, दिलेले योगदान यामुळे युवांची एक अद्विितीय समूह अशी ओळख समाजात झालेली आहे. युवांना मानव संसाधन विकासाचा मुख्य स्त्रोत म्हणून देखील मान्यता देण्यात आलेली आहे. युवा हा समाजाचा अविभाज्य घटक असून विकास प्रक्रीयेतील आवश्यक भाग आहे. समाजातील युवांची संख्या पाहता त्यांचेसाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. वैश्विकरणाच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्याकरीता युवांच्या सक्षमीकरणाची गरज आहे.

युवांचे सक्षमीकरण म्हणजे या युवांच्या क्षमता, अधिकार व निर्णय प्रक्रीयेत समावेश करून त्यांचे आयुष्यासोबतच इतर युवा व प्रौढांचे आयुष्यात देखील बदल घडवून आणणे असा आहे.

युवा सक्षमीकरण हे घरांमधून, शाळा-महाविद्यालयांमधून, युवा मंडळांच्या माध्यमातून, शासकीय धोरणाचे माध्यमातून व समाजाचे माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजनातून करता येणे शक्य आहे. सामाजिक निर्णय प्रक्रीया, संघटनात्मक नियोजन व शैक्षणिक सुधारणा हे युवा सक्षमीकरणाचे प्रमुख घटक आहेत.

या सर्व बाबींचा समावेश करून राज्य युवा प्रशिक्षण संस्था स्थापन केल्यास संस्थेमधून समाजाकरीता शक्तिशाली पाया तयार होऊ शकेल, ज्यामुळे पुढील पिढीकरीता चांगले आदर्श निर्माण होऊ शकतील, युवा नेतृत्व तयार होऊ शकेल ज्यांचेमध्ये सेवा भाव असेल. ही संस्था युवांना आधुनिक तंत्रज्ञानाचे सहाय्याने उत्साही, आनंदी, तणावमुक्त व जबाबदार आयुष्य जगण्याकरीता तयार करू शकेल. त्या अनुषंगाने राज्यात युवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्यातील युवांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देऊन या स्पर्धेच्या युगात शक्तिशाली स्पर्धक म्हणून पुढे आणण्याच्या उद्देशाने खाली नमूद विहीत केलेल्या तरतूदीनुसार युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) **योजनेचे स्वरुप :-**

प्रशिक्षण केंद्र **युवांच्या गरजा ओळखून त्या गरजांच्या पुर्ततेकरीता शिका, नेतृत्व करा, व योगदान द्या**, या सिद्धांतानुसार कार्यरत राहील. सदरचे केंद्र हे शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पूणे येथे स्थापन करण्यात येऊन त्यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील. सदर ठिकाणी या केंद्राकरीता आवश्यक असलेली जागा जसे कार्यालय, प्रशिक्षण कार्यक्रमांकरीता हॉल, निवास व्यवस्था व इतर भौतिक सुविधा उपलब्ध आहेत व त्याकरीता नव्याने निर्मिती करण्याची आवश्यकता नाही.

**२) केंद्राचा उद्देश**

प्रस्तावित केंद्र हे खालील बाबींवर लक्ष केंद्रित करील .

- शिक्षण
- युवा सक्षमीकरणाकरीता विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा व सेमिनार इ.चे आयोजन
- संशोधन
- सल्ला व सहाय्य

**३) आर्थिक भार :-**

सदरचे केंद्र हे राज्यात प्रथमच स्थापन करण्यात येत आहे. सदर केंद्राचा अनावर्ती खर्च आवश्यकतेप्रमाणे खाली नमूद केलेल्या कमाल मर्यादेत करण्यात यावा :

**अनावर्ती खर्च**

| | | |
|---|---|---|
| i. | विविध क्षेत्रातील पुस्तके, नियतकालिके, लेख, डॉक्युमेन्टरी, इ. साहित्य खरेदी करणे | रू.५,००,०००/- |
| ii. | लॅपटॉप, संगणक, प्रिंटर, दुरध्वनी, फॅक्स, स्कॅनर, प्रोजेक्टर, झेरॉक्स मशीन इ. | रू.३,००,०००/- |
| | **एकूण** | **रू.८,००,०००/-** |

४) **प्रशिक्षक :-**

या प्रशिक्षण केंद्रामध्ये सद्यस्थितीत आवश्यक तज्ञ व्यक्तींच्या सेवा आवश्यकतेनुसार मानधन तत्वावर व पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून घेण्यात यावेत. त्यांची शासन सेवेत कायमस्वरूपी नेमणूक करण्यात येणार नाही.

५) **लाभार्थी :-**

सदर योजनेकरीता राज्यातील १३ ते ३५ वयोगटातील युवक-युवती हे लाभार्थी असतील. या केंद्राद्वारे आयोजित कार्यक्रमांची माहिती राज्यातील सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांचे मार्फत युवा मंडळे / संस्था यांचेपर्यंत पोहचविण्यात येईल. संबंधित संस्थांकडून त्यांचे संस्थेत कार्यरत युवांची नावे मागविण्यात येतील व कार्यक्रम समितीमार्फत विविध उपक्रमाकरीता प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाईल.

या केंद्राच्या माध्यमातून खालील उपक्रम राबविण्यात येतील:-

६) **प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

i. खालील विषयांवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील -

- सामाजिक सामंजस्य
- राष्ट्रीय एकात्मता
- निरंतर शांती व सद्‌भाव
- स्त्रोत व व्यवस्थापन
- जीवन कौशल्य शिक्षण इ.

ii. वर नमूद केलेल्या कार्यक्रमांचे नियोजन हे कार्यक्रम समितीचे मार्फत केले जाईल व सदर कार्यक्रमाचा पॅटर्न हा राज्यातील क्रीडा विभागाच्या सर्व कार्यालयांना कळविण्यात येईल व त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

iii. त्याचप्रमाणे युवा सक्षमीकरणाकरीता विविध उपक्रमांचे आयोजन देखील कार्यक्रम समितीमार्फत करण्यात येईल.

iv. अल्प मुदतीच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन देखील कार्यक्रम समितीमार्फत करण्यात येईल.

**<u>आवर्ती खर्च</u>** -

अ) वरील विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांकरीता आवश्यकतेप्रमाणे खाली नमूद कमाल वार्षिक खर्च अनुज्ञेय राहील:

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम |
|---|---|---|
| १ | ५० प्रशिक्षणार्थ्यांचा निवास व भोजन खर्च<br>(प्रतिदिन रू.२५०/- प्रति प्रशिक्षणार्थ्याप्रमाणे ३० दिवसांकरीता) | रू.३,७५,०००/- |
| २ | प्रशिक्षण साहित्य<br>(प्रति प्रशिक्षणार्थी रू.१,०००/- प्रमाणे) | रू.५०,०००/- |
| ३ | प्रशिक्षकांचे मानधन<br>(प्रति अभ्यासक्रम किमान २ प्रशिक्षक रू.२०,०००/- प्रत्येकी या दराने) | रू.४०,०००/- |
| ४ | सादिल खर्च | रू.१०,०००/- |
| | **एकूण** | **रू.४,७५,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे किमान पाच अभ्यासक्रम चालवावयाचे झाल्यास व प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता दरवर्षी किमान सहा बॅचेस पुर्ण करावयाच्या झाल्यास रू.४,७५,००० x ५ अभ्यासक्रम x ६ बॅचेस = रू.१,१४,००,०००/- इतका आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

**<u>ब ) प्रशिक्षण कार्यक्रम</u>**

i) सदर केंद्राचे ठिकाणी वर्षभर विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. संपुर्ण वर्षाचा विचार करता एकूण ५० प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन या केंद्राचे माध्यमातून होणे अपेक्षित आहे.

ii) एका प्रशिक्षण शिबिराचे आयोजनार्थ आवश्यकतेप्रमाणे खाली नमूद केलेल्या कमाल मर्यादेत खर्च करण्यात यावा.

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम |
|---|---|---|
| १ | ५० प्रशिक्षणार्थ्यांचा निवास व भोजन खर्च (प्रतिदिन रू.२५०/- प्रति प्रशिक्षणार्थ्याप्रमाणे १० दिवसांकरीता) | रू.१,२५,०००/- |
| २ | प्रशिक्षण साहित्य (प्रति प्रशिक्षणार्थी रू.५००/- प्रमाणे) | रू.२५,०००/- |
| ३ | प्रशिक्षकांचे मानधन (प्रति प्रशिक्षण शिबिर किमान ४ प्रशिक्षक रू.५,०००/- या दराने) | रू.२०,०००/- |
| ४ | सादिल खर्च | रू.३०,०००/- |
| | **एकूण** | **रू.२,००,०००/-** |

वरीलप्रमाणे एका प्रशिक्षण शिबिराकरीता रू.२.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित असून एका वर्षात किमान ५० प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित होणे अपेक्षित आहे.

त्यानुसार दरवर्षी सदर प्रयोजनार्थ येणारा खर्च म्हणून रू.१००.०० लक्ष एकूण खर्च संबंधित वर्षाचे अर्थसंकल्पिय तरतूदीच्या मर्यादेत होईल, याची दक्षता घ्यावी.

**क) संशोधन -**

i) या केंद्राचे ठिकाणी युवक कल्याण क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबविण्याकरीता नियमित संशोधन कार्य करण्यात येईल.

ii) सदर संशोधन कार्य करण्याकरीता युवक कल्याण क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती / संस्था यांना दरवर्षी अनुदान देण्यात येईल.

iii) युवा प्रशिक्षण केंद्राचे नियंत्रण करणा-या समितीकडे राज्यातून सदर प्रयोजनार्थ मागविण्यात आलेले प्रस्ताव सादर करण्यात येतील व समितीच्या मान्यतेने खालील दराने अनुदान देण्यात येईल

**अनुदान -**

संशोधन कार्याकरीता वैयक्तिक स्तरावर वार्षिक रू.५०,०००/- इतके अनुदान राज्यातील जास्तीतजास्त १० व्यक्तींना देण्यात यावे.

संशोधन कार्याकरीता राज्यातील युवक कल्याण क्षेत्रात कार्यरत संस्थांना वार्षिक रू.२.०० लक्ष इतके अनुदान राज्यातील जास्तीतजास्त ५ संस्थांना देण्यात यावे.

उपरोक्त परिगणनेनुसार वैयक्तिक अनुदान म्हणून रू.५.०० लक्ष तर संस्था स्तरावर रू.१०.०० लक्ष इतका आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

**अनुदान मंजूरीच्या पात्रतेच्या अटी :-**

i) संबंधित संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुबंई विश्वस्त संस्था नोंदणी अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

ii) संबंधित व्यक्ती/संस्थेने युवक कल्याण क्षेत्रात किमान पाच वर्षे कार्य केलेले असावे.

iii) संबंधित व्यक्ती/संस्था ही महाराष्ट्रात कार्यरत असावी.

७) **मंजूरीचे अधिकार :-**

अनुदान मंजुरीचे अधिकार या प्रयोजनार्थ जी कार्यकारी समिती नेमली आहे तीच्या अध्यक्षांना राहतील.

**कार्यकारी समितीची रचना :-**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| २ | मा.अपर मुख्य सचिव शालेय शिक्षण व क्रीडा | सदस्य |
| ३ | मा.प्रधान सचिव, वित्त | सदस्य |
| ४ | मा.प्रधान सचिव, नियोजन | सदस्य |
| ५ | आयुक्त / संचालक , क्रीडा व युवक सेवा | सदस्य |
| ६ | उपसंचालक/सहाय्यक संचालक तथा युवा प्रशिक्षण केंद्र प्रमुख | सदस्य सचिव |

८) **तसेच वरील कार्यकमाचे आयोजन करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यक्रम समिती राहील :-**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | उपसंचालक/सहाय्यक संचालक तथा युवा प्रशिक्षण केंद्र प्रमुख | अध्यक्ष |
| २ | नेहरु युवा केंद्र समन्वयक (पुणे जिल्हा) | सदस्य |
| ३ | राज्यातील राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थ्यांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | राज्यातील स्वयंसेवी युवक मंडळाचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | पुणे विद्यापीठातील रा.से. यो. प्रमुख | सदस्य |
| ६ | राष्ट्रीय छात्रसेना विभागाचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | रोजगार व स्वयंरोजगार विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | व्यावसायिक शिक्षण विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संबंधित सहाय्यक संचालक / क्रीडा अधिकारी | सदस्य सचिव |

९) **वरील अ, ब व क करीता एकत्रित आवर्ती खर्च म्हणून रू.२२९.०० लक्ष इतकी तरतूद आवश्यक राहणार आहे.** मात्र प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पीत तरतूदीच्या अनुषंगाने कार्यक्रम राबविण्यात यावा.

१०) उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

११) नियमात अंशत: / पूर्णत: बदल करण्याचे अथवा नियम शिथील करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१२) हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील व पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

१३) सदर योजनेवरील खर्च हा मागणी क्र. ई -३ -२२०४ क्रीडा व युवक सेवा १०३ विद्यार्थीत्तर युवक कल्याण कार्यक्रम, १०-युवक कल्याण- ग्रामीण भाग, ०७-युवा धोरणांतर्गत योजना, युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना (२२०४ - ५५३७) ३१ सहाय्यक अनुदाने वेतनेत्तर या लेखाशीर्षांतर्गत त्या-त्या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

१४) हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. अनोसं ५४१/व्यय-५ दिनांक ०९.०७.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१११६१३०५२७६०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.11.16 13:03:34 +05'30'

**(रा.चं. पाटील)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
९. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
११. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१२. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३